MHDH040007712022

<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१६९/२०२२</u>

<u>सुरेखा प्रकाश चौधरी वि.निरंक</u>

## <u>निशाणी क्र.१ खालील आदेश</u>

अर्जदार यांनी कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन की, मयत सोमनाथ चिंधा चौधरी हे अर्जदाराचे वडील होते. सोमनाथ चिंधा चौधरी हे दिनांक १३.०८.२०२२ रोजी मौजे पारोळा, ता. पारोळा जि. जळगांव येथे मयत झालेले आहेत. तसेच मयताची आई नामे गोजरबाई चिंधा चौधरी हया दिनांक ०९.०७.१९९८ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत सोमनाथ चिंधा चौधरी यांना त्यांच्या मृत्युपश्चात अर्जदार व इतर पत्नी नामे प्रमिलाबाई सोमनाथ चौधरी, मुलगा नामे प्रविण सोमनाथ चौधरी, मुली नामे सुरेखा प्रकाश चौधरी व निर्मला चंद्रकांत चौधरी असे कायदेशीर वारस असुन त्यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

३. तसेच रतन चिंधा चौधरी हे अर्जदाराचे काका होते व ते दिनांक ०३.०२.२००२ रोजी मयत झालेले आहेत. मयताची पत्नी नामे सोनीबाई रतन चौधरी हया देखील पुर्वीच मयत झालेल्या आहेत. मयत रतन चिंधा चौधरी यांना त्यांच्या मृत्युपश्चात मुलगी नामे शोभा दिलीप चौधरी व मयत मुलगा नामे भुपेंद्र रतन चौधरी तर्फे वारस नामे त्यांची पत्नी नामे वैशाली भुपेंद्र चौधरी व मुलगा नामे अदित्य भुपेंद्र चौधरी असे कायदेशीर वारस आहेत.

४. तसेच अंबालाल चिंधा चौधरी हे देखील अर्जदाराचे काका होते व ते दिनांक १६.०९.२००७ रोजी मयत झालेले आहेत. मयत अंबाबाल चिंधा चौधरी यांना त्यांच्या मृत्युपश्चात पत्नी नामे गुंताबाई अंबालाल चौधरी, मुले नामे दिलीप अंबालाल चौधरी, प्रल्हाद अंबालाल चौधरी, मुली नामे सुनंदा धनराज चौधरी व मनीषा सुभाष चौधरी असे कायदेशीर वारस आहेत.

५. मयत सोमनाथ चिंधा चौधरी, रतन चिंधा चौधरी व अंबालाल चिंधा चौधरी यांच्या नावे मौजे मालपुर, ता. शिंदखेडा जि. धुळे येथे सि.स.नं. ४५० क्षेत्र ३५ चौ.मी. अशी

वडीलोपार्जीत मिळकत असुन सदर वर नमुद मिळकतीवर मयत सोमनाथ चिंधा चौधरी, रतन चिंधा चौधरी व अंबालाल चिंधा चौधरी यांचे वारस म्हणुन वर नमुद अर्जदार व इतर नावे लावण्यासाठी मयतांच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

६. अर्जदार यांनी अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी स्वतःचे शपथपत्र नि.१० वर दाखल केलेले आहे. सदर शपथपत्रात अर्जदार यांनी अर्जातील कथनांचा पुनरउल्लेख केला असुन मयत सोमनाथ चिंधा चौधरी हे अर्जदाराचे वडील असुन मयत रतन चिंधा चौधरी व अंबालाल चिंधा चौधरी हे अर्जदाराचे काका आहेत. त्यांच्या मृत्युपश्चात त्यांना वर नमुद अर्जदार व इतर हे कायदेशीर वारस असुन त्यांच्या लाभात वारस प्रमाणपत्र देण्याची मागणी केली असुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

७. अर्जदाराने अर्जासोबत यादी निशाणी क्र.३ सोबत मयत सोमनाथ चिंधा चौधरी, रतन चिंधा चौधरी, अंबालाल चिंधा चौधरी, गोजरबाई चिंधा चौधरी, सोनीबाई रतन चौधरी व भुपेंद्र रतन चौधरी यांच्या मृत्युदाखल्यांची पडताळणी केलेल्या प्रती, अर्जदार व इतर यांच्या आधारकार्डांची पडताळणी केलेल्या प्रती व मयत सोमनाथ चिंधा चौधरी, रतन चिंधा चौधरी व अंबालाल चिंधा चौधरी यांच्या नावे असलेल्या मौजे मालपुर, ता. शिंदखेडा जि. धुळे येथे सि.स.नं. क्र. ४५० च्या मालमत्ता उताऱ्याची प्रत अशी कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेले आहेत.

८. अर्जदाराने अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र 'दैनीक वार्ता' यामध्ये दिनांक २१.१०.२०२२ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. मात्र मुदतीत किंवा आजपर्यंत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

९. वरील कागदपत्रांच्या अनुषंगाने माझे असे मत आहे की, मयत सोमनाथ चिंधा चौधरी, रतन चिंधा चौधरी व अंबालाल चिंधा चौधरी यांना त्यांच्या मृत्यु पश्चात वर नमुद अर्जदार व इतर हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे दाखल पुराव्यावरुन अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे मयतांचे अर्जदार व इतर हे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे कायदेशीर वारस प्रमाणपत्र त्यांचे लाभात देणे न्यायोचीत होईल म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश करतो.

<u>**आदेश**</u>

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदाराच्या मागणी प्रमाणे मयत सोमनाथ चिंधा चौधरी, रतन चिंधा चौधरी व अंबालाल चिंधा चौधरी यांच्या नावे असलेल्या मौजे मालपुर, ता. शिंदखेडा जि. धुळे येथे सि.स.नं. ४५० क्षेत्र ३५ चौ.मी. अशा वडीलोपार्जीत मिळकतीवर नांवे लावणेकामी त्यांच्या मृत्यु पश्चात अर्जदार व इतर नामे प्रविण सोमनाथ चौधरी, सुरेखा प्रकाश चौधरी, निर्मला चंद्रकांत चौधरी, प्रमिलाबाई सोमनाथ चौधरी, शोभा दिलीप चौधरी, वैशाली भुपेंद्र चौधरी, आदीत्य भुपेंद्र चौधरी, गुंताबाई अंबालाल चौधरी, दिलीप अंबालाल चौधरी, प्रल्हाद आंबालाल चौधरी, सुनंदा धनराज चौधरी व मनीषा सुभाष चौधरी हे कायदेशीर वारस असुन त्यांचे नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर जारी करण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AVINASH WAMANRAO KSHIRSAGAR
Date: 2022.12.21 12:27:53 +0530

(अविनाश डब्ल्यु क्षिरसागर )

दिनांकः– २१.१२.२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दोंडाईचा.

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न् शब्द मूळ आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – बी.एन. थोरात |
| न्यायालयाचे नांव | – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – २१.१२.२०२२ |

स्वाक्षरित/–
लघुलेखक.